**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1898/2007.**

श्री विकास गणपतराव शेंडे
रा. नागरी बॅंक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्यामागे,
हिन्दनगर वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री म. दि. अडिवडेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई–32.
2) श्री वि. बा. खुपेकर
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई–32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.7.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. माहितीचा अर्ज प्रपत्र अ व प्रथम अपीलाचे प्रपत्र ब हे जोडलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांचेकडून पुन्हा ते मागविण्यात आले व त्यानंतर सदरचे अपील सुनावणीस घेण्यात आले.

2.  अपीलकर्ता यांनी दि. 16.1.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) माहितीशी संबंधीत कालावधी पाच ते दहा वर्षे

2) माहितीचा विषय : अनधिकृत बांधकामावर कारवाई न करणे.

3) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय : अ) नगरविकास मंत्रालयाला आवश्यक कारवाईबद्दल मा. मुख्यमंत्र्यानी सुचना देवून सुध्दा अजून कारवाई नाही.

ब) वरिल पत्राच्या अनुषंगाने नगरविकास मंत्रालय, सामान्य प्रशासन मंत्रालय, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, राज्यपाल नागपूर सुधार प्रन्यास यांना निवेदन देवून उपयोग नाही.

क) कायदा असून नियमाचे पालन नाही तर कायद्याचे अर्थ काय शासनाने धोरण स्पष्ट करावे.

ड) शासनाचे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासकीय अधिका—याची नेमणूक केली प्रचंड खर्च केला परंतु त्याचा उपयोग झाला नाही.

इ) या मुळे माझे 10—15 लाखाचे नुकसान झाले याबद्यल शासनाने, शासनाच्या दोषी अधिका—याकडून नुकसान भरपाई दयावी.

फ) आतापर्यंत कारवाई कां केली नाही. अहवाल द्यावा.

र) वरिल माहिती रजिस्टर पोष्टाने पाठवावी.

4) वरिल माहिती महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे की मंगलराज आहे. नुकसान भरपाई दोषी अधिकारी व शासनाकडून घेण्याबद्यल.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 4.2.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नगर विकास विभाग यांनी अपीलकर्ता यांना वस्तुस्थितीदर्शक माहिती दिलेली दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालयामध्ये प्रथम अपील

दिनांक 27.3.2006 रोजी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 5 मे 2006 ला अपीलकर्ता यांना उत्तर पाठविलेले दिसून येते. व सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

श्री विकास गणपतराव शेंडे यांचे माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाच्या नमुन्यात नमुना पत्र ''अ'' दि. 16.1.2006 चे पत्र मा. मुख्यमंत्री सचिवालयाकडून संदर्भ क्र. मुमंस/06/5370 दि. 19.1.2006 अन्वये नगर विकास विभागाकडे दि. 30.1.2006 रोजी प्राप्त होवून ते नवि–26 कार्यासनास अंकित झाल्यानंतर माझ्याकडे प्राप्त झाले.

श्री विकास गणपतराव शेंडे यांचे दि. 16.1.2006 चे पत्रामध्ये अनधिकृत बांधकामावर कार्यवाही संदर्भात विषय असल्याने व या विषयाबाबत यापूर्वी श्री विकास गणपतराव शेंडे यांचे दि. 15.12.2004 चे पत्र दि. 21.1.2005 ला प्राप्त होणे व त्यामध्ये केवळ प्रश्नाच्या स्वरुपात माहिती विचारली होती. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारणे अभिप्रत नसल्याने व श्री शेंडे यांनी दि. 16.1.2006 च्या अर्जात मागणी व तक्रारीच्या स्वरुपात मुद्दे नमूद केले असल्याने त्यावर मी पत्र क्र. नापमा2305/290/नवि:26 दि. 12.1.06 रोजी त्यांना त्यांच्या विषयाबाबत माहिती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करुन उत्तर दिले होते. आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनाही सदर पत्राची प्रत पृष्ठांकित करुन संबंधितांच्या प्रलंबित अपिलावर अंतिम आदेश झाले असल्यास संबंधितांना तातडीने कळविण्याच्या सूचना दिल्या होत्या हे विचारा घेवून श्री शेंडे यांच्या दि. 16.1.06 च्या पत्रात अनधिकृत बांधकामावर कारवाई न करणेबाबत मुद्दा विचारात घेवून व अन्य मुद्यामध्ये कोणतीही स्पष्ट माहिती देण्याची मागणी केलेली नाही हे विचारात घेवून यापूर्वीच या विषयक दि.

12.1.2006 च्या पत्राने माहिती दिली असल्याने व कोणतीही माहिती पत्रासोबत सलग्न नसल्याने श्री शेंडे यांनी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविण्याची विनंती केली होती तथापि, रजिस्टर्ड पोस्टाचे शुल्क पाठविले नव्हते. हे लक्षात घेवून माहिती दिली आहे व त्यांना ती माहिती प्राप्त झालेली आहे हे त्यांच्या दि. 27.3.2006 च्या अपिलात नमूद केल्याप्रमाणे स्पष्ट होते.

श्री विकास गणपतराव शेंडे यांचे दि. 27.3.2006 चे माहितीचा अधिकार 2005 च्या कलम 19 (1) नुसार अपील मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालयास अपिलीय अधिकारी यांच्या नावाने पाठविण्यात आले होते. सदरचे अपिल मुख्यमंत्री सचिवालयाचे संदर्भ क्र. मुमंस 06/45445 दि. 26.4.2006 अन्वये नगर विकास विभागाच्या नोंदणी शाखेत दि. 28.4.2006 रोजी प्राप्त झाले. नगर विकास विभागाच्या नोंदणी शाखेकडून सदरचे अपिल नवि–26 कार्यासनाच्या अपिलीय अधिका–याकडे न पाठविता ते सरळ नवि–26 कार्यासनाकडे दि. 2.5.2006 रोजी प्राप्त झाले. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 ची अंमलबजावणी ऑक्टोबर 2005 मध्ये राज्यात सुरु झाली सदर कायद्याची अंमलबजावणी सुरु होवून 6 महिन्याचा कालावधी जवळपास झाला असल्याने या सुरुवातीच्या कालावधीत माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या अधिनियमाच्या तरतूदीबाबत सखोल माहिती नसल्याने अपिलीय अधिकारी यांनीच अपिल निर्णय घ्यावा हे अनवधानाने लक्षात न आल्याने व सदरचे अपिल अर्जावर संबंधीतांना माहिती देण्याच्या सकारात्मक दृष्टीने यापूर्वी मी दिलेल्या दि. 4.2.2006 च्या पत्रातील मुद्यांचा मी प्रामाणिक प्रयत्न करुन तातडीने दि. 5.5.2006 रोजी उत्तर दिले. सदरचे उत्तर देताना मी शासकीय माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी या अधिकारांतर्गत उत्तर दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तदतूदी क्रमाक्रमाने व प्रत्यक्ष कामकाज करीत असतांना लक्षात आल्या असून यानंतर अशा प्रकारच्या अपिलावर माहिती अधिकारी या अधिकारात मी कोणतेही उत्तर दिलेले नाही. दि. 5 मे 2006 चे दिलेले उत्तर गैरहेतूने ठेवून दिलेले

आहे. हे नम्रपणे निदर्शनास आणण्यात येत आहे. यास्तव सदरची बाब क्षमापित करण्यात यावी व भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही याची मी ग्वाही देतो.

यानंतरही संबंधीतांच्या आलेल्या अर्जावर त्यांना प्रत्यक्षपणे अथवा वेळेवर उपलब्ध असलेली माहिती मी देण्याचा प्रमाणिक प्रयत्न केलेला आहे.

तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

मा. मुख्यमंत्री यांचे सचिवालयात दि. 26.4.2006 ला प्राप्त झाले आणि ते नगर विकास विभागात दि. 28.4.2006 ला नोंदणी शाखेत प्राप्त झाला. तथापि सदर अपिलावर अपीलीय अधिकारी, नगर विकास विभाग नवि–26 असा उल्लेख नसल्याने नोंदणी शाखेने अनावधानाने कार्यासन नवि–26 येथे पाठविले आणि त्याची त्वरीत दखल घेवून जन माहिती अधिकारी यांनी श्री शेंडे यांना दि. 5 मे 2006 ला माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदी नमुद करुन उत्तर तत्परतेने पाठविले.

अपीलीय अधिकारी म्हणून वर नमुद केलेल्या परिस्थितीत आदेश पारीत केले नाहीत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दि. 4.2.2006 व 5 मे 2006 ला अर्जदारास पत्राने कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. 4.2.2006 ला दिलेली माहिती अर्जदाराचे समाधान करणारी नाही. उपरोक्त 5 मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे निर्णय देता आला नाही. तथापि अर्जदाराने शासनाकडे पत्रव्यवहार करुन मागितलेली माहिती (नागपूर गृहनिर्माण मंडळाने बांधलेल्या इमारतीतील अनधिकृत बांधकाम काढण्यास नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, गृहनिर्माण विभाग, नगर विकास विभाग, गृह विभागास अपयशी असणे, मा. मुख्यमंत्री यांचे आदेशाची अंमलबजावणी न करणे, नुकसान भरपाई मिळणे) व त्या अनुषंगाने विभागाने केलेली सविस्तर टिप्पणी व कागदपत्र सोबत जोडली आहे.

अर्जदाराने यापूर्वी 44 एमआयजी, मानेवाडा, नागपूर येथील अनधिकृत बांधकामाबाबत दि. 17.10.2000 ला पत्र पाठविले होते. त्यास अनुसरुन मा. मुख्यमंत्री

6

यांचेकडे पत्र पाठविले होते. सदर पत्रास अनुलक्षून मा. मुख्यमंत्री यांनी अर्जदारास याबाबतची प्रस्तुत प्रकरणी लक्ष घालून याबाबतची कार्यवाही आपणास कळविण्याबाबत मी प्रधान सचिव, नगर विकास यांना सूचना देत आहे असे दि. 27.11.2000 ला कळविले होते. त्यानुसार अद्यापही कार्यवाही झाली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

नागपूर सुधार प्रन्यासकडून दि. 27.11.2000 च्या पत्राने मिळालेल्या माहितीनुसार नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने मौ. मानेवाडा येथे खसरा क्र. 48/1(क) व 48/1(ख) मौ. मानेवाडा येथे 11 इमारतीत प्रत्येकी 4 प्रमाणे 44 गाळे दुमजली (ग्राऊंड+1), विणकर कॉलनी विद्यानगरी येथे बांधले. तेथे श्री शेंडे यांचा गाळा क्र. 7/4 आहे. मात्र ते तेथे न राहता नागरी बॅंक कॉलनी, हिंदनगर वर्धा येथे राहतात. या 44 गाळयांपैकी 11 गाळेधारकांनी (बालकनी बंद करणे, तळ मजल्यावरील गाळे धारकांनी गाळयाच्या आजूबाजूला सोडलेल्या मोकळया जागांना कंपाऊंड भिंत घालणे) अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे केली आहेत ती तोडण्याची मागणी आहे. नासुप्रने दि. 12. 8.1985, 28.9.1985 ला नोटीस देवून देखील संबंधितांनी आपणहून जादा काम न काढल्यामुळे नासुप्रने दि. 25.5.1996 ला 3 अनधिकृत बांधकाम काढली. त्यानंतर गाळेधारकांनी विशेषतः महिलांनी प्रखर विरोध केल्यामुळे आणि अडथळा निर्माण केल्यामुळे संरक्षणाअभावी उर्वरित 8 बांधकाम काढणे शक्य झाले नाही. त्यामुळे नागपुर गृहनिर्माण मंडळाला दि. 20.9.1997 च्या पत्रान्वये पोलीस विभागाचे सहकार्य घेवून अनधिकृत बांधकाम पाडण्याची कार्यवाही केल्यास नासुप्र आपल्याकडील यंत्रणा उपलब्ध करुन देईल. तथापि अशी कार्यवाही गृहनिर्माण मंडळाने केली नसल्याने मुख्यमंत्र्याच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही असे श्री शेंडे यांचे म्हणणे आहे.

श्री शेंडे यांचे अन्य गाळेधारकांशी वाद असून त्यामुळे त्यांचे नुकसान झाले आहे असे ते म्हणतात मात्र कशा प्रकारचे नुकसान आणि किती रकमेचे झाले आहे हे श्री शेंडे यांनी अद्यापही कळविले नाही.

श्री शेंडे यांनी याबाबत विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच नागपूर महानगरपालिका तसेच मा.उप लाक आयुक्त यांचे कार्यालयाकडे केलेले अपिल संबंधितांनी फेटाळून लावले आहे. याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती सोबत जाडल्या आहेत.

यापूर्वी मानेवाडयातील भाग हा नासुप्रच्या कार्यकक्षेत होता त्यानंतर सदर भाग दि.27.2.2002 पासून नागपूर महानगरपालिका क्षेत्रात आहे. तथापि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 44 च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ हे सुध्दा स्थानिक प्राधिकरण असल्याने तेथील बांधकामास नागपूर महानगरपालिकेच्या परवानगीची आवश्यकता नाही असे श्री शेंडे यांना दि. 5.7.2004 ला महानगरपालिकेने कळविलेले होते. श्री शेंडे यांनी सदर माहिती मिळाल्याचे देखील मान्य केल्याबद्यल नासुप्रने शासनास कळविले. त्याच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

अर्जदाराने उपस्थित केलेले मुद्दे मोघम स्वरुपाचे आहेत याबाबत सदर क्षेत्र महानगरपालिकेच्या कार्यकक्षेत असल्याने त्यांचेशी संपर्क साधावा असे माहिती अधिका–याने दिलेले उत्तर योग्य आहे. तसेच रजिस्टर पोस्टाने पाठविण्याबाबत दिनांक 16.1.2006 च्या अर्जात उल्लेख आहे. माहिती अधिकारी यांनी दि. 6.2.2006 ला दिलेले उत्तर योग्य आहे.

वर स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती अधिका–याने योग्य ते उत्तर दिले आहे. नुकसान कशाप्रकारचे झाले आहे व त्याची परिगणणा कशाप्रकारे केली आहे आणि त्यास प्रत्यक्षरित्या नागपूर सुधार प्रन्यास अथवाा नागपूर महानगरपालिका कोणत्या अर्थाने जबाबदार आहे त्यांनी नुकसान भरपाई देण्यास नकार दिला आहे काय आणि नकार दिला असल्यास तसे शासनास केव्हा कळविले हे स्पष्ट केले नसल्याने अर्जदारास माहिती देता येणे शक्य नाही.

तरी देखील श्री शेंडे यांनी त्यांच्या कॉलनीतील अनधिकृत बांधकामाबाबत

केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 24.8.2006 च्या अर्धषासकीय पत्राने आयुक्त नागपूर महानगरपालिका यांना सूचित केले होते.

याशिवाय नागपूर येथील अनधिकृत बांधकामाबाबत विचारणा केलेली माहिती सुस्पष्ट नसून प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मध्ये ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येत उक्त बाब मोडत नसल्याने सदरची माहिती देता येवू शकत नाही असे नमुद करुन अपिल करावयाचे असल्यास पत्र मिळाल्यापासून 30 दिवसांत अपिल करु शकतात असे देखील या विभागाच्या अवर सचिव तथा माहिती अधिकारी नवि–30 यांनी श्री शेंडे यांना दि. 6 जानेवारी 2007 च्या पत्रान्वये कळविले होते. सदर पत्राची प्रत जोडली आहे.

आपले पत्र क्र. रामआ/अपिल/प/2153/08 दि. 5 जून 2008 हे या विभागात दि. 12.6.2008 ला प्राप्त झाले. तथापि सदर कार्यासनात (नवि–18) मध्ये पर्यवेक्षिय अधिकारी व लिपिक नसल्याने संबंधित अधिका–याकडून दि. 25 जूलै 2008 ला कक्ष अधिकारी (नवि–26) यांना प्राप्त झाले. त्यामुळे या पत्राची वेळीच दखल घेता आली नाही याबद्यल विभागाच्या वतीने दिलगीरी व्यक्त करतो.

एकूणच श्री शेंडे हे मुख्यमंत्री यांच्या आदेशाची अंमलबजावणी न होणे आणि अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही होत नाही अशा मोघम स्वरुपाच्या मुद्यावरील नेमकी माहिती मागण्याचा आग्रह करीत आहेत तो वस्तुस्थितीस धरुन नसल्याने नेमकी माहिती देणे शक्य नाही.

नागपूर महानगरपालिकेने यापूर्वीच कळविल्यानुसार नागपूर गृहनिर्माण मंडळ हे स्थानिक प्रधिकरण असल्याने त्यांच्या कार्यक्षेत्रातील विणकर गृहनिर्माण संस्था येथील अनधिकृत बांधकाम काढण्याची कार्यवाही त्याच कार्यालयाने करणे योग्य आहे.

उपरोक्त खुलासा मान्य व्हावा.

जन माहिती अधिकारी यांनी तोंडी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांनी ज्या अनधिकृत बांधकाच्या संदर्भामध्ये कारवाईची अपेक्षा आहे ते अधिकार हे महानगर पालिका, एन आय टी किंवा म्हाडा यांचेकडे आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या पुर्वीच्या अनेक अर्जाच्या अपीलातील वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे तसेच वेळोवेळी त्यांना समजावून सांगितलेले आहे तरी सुध्दा अपीलकर्ता हे शासन स्तरावर मा. मुख्यमंत्री किंवा मा. राज्यपाल यांचे कार्यालयात अर्ज करीत असतात व ते सर्व हे अर्ज अर्थातच ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध आहे त्याच कार्यालयात कारवाईसाठी पाठविले जातात. त्याप्रमाणे त्या त्या कार्यालयामध्ये त्याबाबत असलेल्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे व वस्तुस्थितीप्रमाणे तपासणी करुन कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे व तरीसुध्दा अपीलकर्ता हे वारंवार वर नमुद केल्याप्रमाणे वरीष्ठ कार्यालयामध्ये अर्ज करीत असतात. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी सदरच्या अर्जामध्ये निश्चित अशा पूर्वी केलेल्या अर्जाचा संदर्भ वा कोणताही तपशिल दिला नाही. संपूर्ण अर्जामधील मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे तसेच जे मुद्दे उपलब्ध केलेले आहेत त्यामध्ये सुध्दा माहिती ही कोणत्याही प्रकारची मागितलेली नाही त्यांचा एकच उद्येश दिसतो तो आतापर्यंत कारवाई कां केली नाही याबद्यलचा अहवाल द्यावा. परंतु मुळातच माहितीच्या अर्जामध्ये कोणत्या प्रकरणात त्यांना माहिती पाहिजे आहे याचा उल्लेख नाही. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांच्या अनेक अर्ज करण्याच्या सवयीमुळे अपीलकर्ता यांना काय अपेक्षित आहे हे ज्ञात असल्यामुळे त्यांनी त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. मा. मुख्यमंत्री कार्यालयामध्ये स्थानिक स्तरावरील कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नसते. त्यातही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या ''माहिती'' या संज्ञेच्या

10

व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, टिपण्या, परिपत्रके, कागदपत्रे इत्यादीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अर्थ आहे व या निकषावरुन अपीलकर्ता यांच्या दि. 16.1.06 च्या अर्जामधील एकही मुद्दा दिसून येत नाही. व त्यामुळेही सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असे दिसून येते. प्रथम अपील सुध्दा अपीलकर्ता यांनी मा. मुख्यमंत्री कार्यालय यांचेकडेच दाखल केले. व यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या कायदयाच्या तरतुदीचा आधार घेतात. मात्र त्यातील पुढील कोणत्याही तरतुदीचा अभ्यास केलेला दिसून येत नाही किंवा त्या तरतुदीची त्यांना जाणीव दिसून येत नाही. एकदा अधिनियमाच्या तरतुदीचा आधार घेतल्यावर संपूर्ण अधिनियमाच्या पुढील तरतुदीसुध्दा अर्जदारास लागू होतात याची जाणीव सुध्दा अपीलकर्ता यांना दिसत नाही. पुन्हा अपीलकर्ता हे सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरण्याचा प्रयत्न करतात अशा प्रकारचे अर्ज करीत आहे असे तरी म्हणावे लागते. अपीलकर्ता यांचे आतापर्यंत आयोगाकडे दिड वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक अपीले सुनावणीस आली आहेत व त्यातही संपूर्ण अपीले म्हाडा, एन आय टी, महानगर पालिका, पोलीस इत्यादीच्या संदर्भात त्यांनी दाखल केलेली होती. व एवढे करुनही त्यांचा प्रश्न सुटत नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळेच त्यांनी निश्चित अशी मागणी केल्यास माहिती मिळू शकते. असे अनेक अर्ज केल्यास कोणत्याही प्रकारचे प्रश्न सुटत नाही याची जाणीव दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल करतांना अपीलकर्ता यांच्या पुर्वीच्या पत्रामधील कारवाई किंवा एन आय टी नी कारवाईचा अहवाल सादर केला आहे. त्याचप्रमाणे उपआयुक्त महानगरपालिका यांनी शासनास केलेल्या पत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्या दि. 29.11.2000 च्या आदेशाची प्रत दाखल केली आहे.

दि. 9.3.2006 रोजी अपर आयुक्त तथा प्रथम अपीलीय अधिकारी महानगरपालिका यांनी परीत केलेल्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. उपसचिव श्री म. दि. अडिवडेकर यांनी श्री लोकेशचंद्र यांना दि. 24.8.2006 च्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. तसेच राज्य जन माहिती अधिकारी सहायक प्रारुपकार नि अवर सचिव यांनी दि. 17.11.2006 रोजी अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 11.10.2006 रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य सचिव कार्यालय यांचेकडे केलेल्या अर्जाची सुध्दा उत्तराची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. तसेच दि. 6.1.2007 रोजी अवर सचिव तथा माहिती अधिकारी नगर विकास विभाग यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिल्याची छायांकित प्रत दाखल केली आहे व त्यावरुनही अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज अनेक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये केलेले दिसून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांना अनेक अर्जाच्या माध्यमातून एकच माहिती अनेक प्रश्न उपस्थित करुन पाहिजे आहे. अंतिमतः अपीलकर्ता यांच्या दि. 16.1.2006 चा अर्ज हा योग्य त्या माहिती अधिका–याकडे केलेला नसल्यामुळे, मोघम असल्यामुळे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम च मधील ''माहिती'' या संज्ञाच्या व्याख्येत मोडत नसल्यामुळे त्याबाबत दिलेले उत्तर हे विहित मुदतीत दिलेले असून योग्य आहे तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता हे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, सचिव नगर विकास हयांचेकडे कशा प्रकारे अर्ज करतात याबद्यल आयोगाचे निदर्शनास आणले. त्यांच्या दि. 7.6.2006 च्या अर्जामध्ये ''परंतु लोक आयुक्त सुध्दा शासनाचे मिंधे हस्तक आहे त्यांनी गुन्हेगार अधिका–यांना संरक्षण दिले व माझा हक्क डावविला आहे. आज मला माझे घरात राहण्याचा हक्क शासनाने घालविला सर्व पोलीस खातु सुध्दा नांगी टाकते कारण गैरव्यवहारी भ्रष्टाचारी शासकीय यंत्रणा होय. त्यामुळे 25 लाखाचे माझे नुकसान झाले.'' यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा

12

अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या वर नमुद केल्याप्रमाणे अनेक अपीलाच्या सुनावणीच्या माध्यमातून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींची जाणीव करुन देण्यात आली असुन सुध्दा त्यांची अनेक अपीले ही दाखल झालेली असल्यामुळे व ती सुनावणीस लावावी लागत असल्यामुळे आयोगाकडे इतरांची अपीले प्रलंबित राहतात व ज्यांना खरोखरच माहितीची आवश्यकता आहे त्यांची अपीले मात्र ही विलंबाने सुनावणीस येतात हे निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 16.1.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांच्या दि. 27.3.2006 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 30.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.